## निवडक

### साखळी नगर वाचनालयात १४ पासून उन्हाळी शिबिर

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**साखळी, दि. ७ :** साखळी रवींद्र भवन परिसरात असलेल्या सरकारी नगर वाचनालयातर्फे बुधवार दि. १४ ते शुक्रवार दि.१६ मे याकाळात दुपारी ३ ते संध्याकाळी ६ यावेळेत उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. मुलांना वाचनाची, लेखनाची आवड निर्माण व्हावी तसेच आनंदमयी शिक्षण घेता यावे यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सर्जनशीलता शोधा आणि नगर वाचनालयात येऊन 'शिका' या मथळ्याखाली हे शिबीर होणार आहे.या शिबिरात सांखळी व परिसरातील वय वर्षे १० ते १५ वयोगटातील विद्यार्थ्यांना सहभागी होता येईल.

या शिबिरात बुधवार दि. १४ रोजी अर्जून गावस यांची 'अभिनय कार्यशाळा' होणार असून यात ते अभिनयासाठी असलेल्या आवश्यक बाबी प्रात्यक्षिकासह समजावून सांगणार आहेत.तसेच विद्यार्थ्यांकडून करून घेणार आहेत.गुरुवार दि.१५ रोजी स्नेहा वाडकर यांची 'चित्रकला' कार्यशाळा होणार असून यात त्या चित्र रेखाटणे, रंगविणे सारख्या विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. शुक्रवार दि.१६ रोजी राघोबा लवू पेडणेकर यांची 'हस्ताक्षर कार्यशाळा' होणार असून यात ते हस्ताक्षर कशाप्रकारे सुधारता येईल हे प्रात्यक्षिकांसह सांगणार आहेत.

अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी ग्रंथालयाचे ग्रंथपाल ब्रिजेश चणेकर यांच्याकडे ९७६७४४३६९६ या क्रमांकावर संपर्क साधावा.नाव नोंदणीची शेवटची तारीख ११ मे ही असेल.प्रथम येणाऱ्यास प्रथम तत्वावर नाव नोंदणी करून घेतली जाईल.

--------------------------------- ----

### सत्य साई प्रेम प्रवाहिनी रथयात्रा वास्कोत भक्तिमय वातावरणात साजरा

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**वास्को, दि. ७ :** भगवान श्री सत्य साई बाबांच्या जन्मशताब्दी निमित्त आयोजित श्री सत्य साई प्रेम प्रवाहिनी रथयात्रेचा दहावा दिवस वास्को येथे अत्यंत भक्तिमय आणि भावनिक वातावरणात साजरा करण्यात आला. हा दिवस केवळ भक्ती आणि एकतेसाठीच नव्हे, तर पालक आणि मुलांमधील पवित्र नात्याचा सन्मान करण्यासाठीही समर्पित होता.

दिवसाची सुरुवात सकाळी ५:२० वाजता ओंकार आणि सुप्रभातच्या पवित्र घोषाने झाली. त्यानंतर संमन हॉटेल, पाई हॉस्पिटल, वाडेम चर्च आणि पुन्हा परत या मार्गावर मोठ्या संख्येने भक्तांनी एकत्र येऊन भजन गात नगरसंकीर्तन केले. सकाळच्या कार्यक्रमाचा समारोप आरती आणि प्रसाद वितरणाने झाला, ज्यामुळे सर्वांच्या मनात शांती आणि समाधानाची भावना निर्माण झाली.

संध्याकाळी बालविकास गुरु आणि मुलांनी आयोजित केलेला 'ईश्वराम्बा दिवस' साजरा करण्यात आला. भगवान श्री सत्य साई बाबांनी पालकांप्रती कृतज्ञता आणि आदर निर्माण व्हावा म्हणून सुरू केलेल्या 'मातृ–पितृ पूजन' या अनोख्या विधीची सुरुवात सायंकाळी ५ वाजता पदाधिकाऱ्यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. बालविकास विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्याने आणि गुरुंनी पालकांना दिलेल्या फुलांनी संध्याकाळी प्रेम आणि कृतज्ञतेचे वातावरण निर्माण झाले. १०० हून अधिक भक्तांनी या हृदयस्पर्शी सोहळ्याला साक्षी दिली.

पूजनाची सुरुवात स्वामींनी हा विधी का सुरू केला याचे कथन करून झाली. पालक आणि मुलांनी एकमेकांना मिठी मारून प्रेमाचे प्रतीक दिले, त्यामुळे अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू आले. पूजनाचा समारोप मुलांनी पालकांना आरती करून केला. त्यानंतर मुलांनी वेदपठण केले आणि महिलांनी कलश घेऊन रथाचे स्वागत केले, ज्यामुळे संपूर्ण वातावरण पवित्रतेने भारले गेले.

संध्याकाळी, प्रेम आणि एकतेचा संदेश वास्कोच्या रस्त्यांवर पोहोचवण्यासाठी रथासह वॉकिंग रॅलीचे आयोजन करण्यात आले. ही रॅली गोव्याचे राज्य अध्यक्ष आणि मॅडम सॅमी सालकर (मुरगाव नगरपरिषदेच्या नगरसेविका व श्री दाजी सालकर, आमदार यांच्या पत्नी) यांच्या नेतृत्वाखाली, विद्याधिराज भवन येथून सुरू होऊन वास्को रेल्वे स्टेशन, चझढ इन्स्टिटट्यूट आणि पुन्हा विद्याधिराज भवन येथे परत आली. भक्तांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला, संपूर्ण शहरात सकारात्मक ऊर्जा आणि भक्तिभाव पसरवला. रथ जसजसा पुढे गेला, काही भक्तांनी आरती अर्पण केली, तर वास्कोकरांनी कुतूहल आणि श्रद्धेने हा सोहळा पाहिला. अनेकांनी या यात्रेत सहभागी होत स्वामी आणि त्यांच्या प्रेम व सेवेच्या संदेशाबद्दल जाणून घेण्याची उत्सुकता दाखवली.

गोव्यातील रथयात्रेचा प्रवास – श्री सत्य साई प्रेम प्रवाहिनी रथयात्रेने गोव्यातून आपला प्रवास सुरू केला असून, पुढील ४० दिवस राज्यातील प्रमुख शहरे, गावं आणि पवित्र स्थळांना भेट देणार आहे. करमळी, सावे–वेरेम आणि आता वास्को येथे हजारो भक्तांना या यात्रेने प्रेरित केले आहे. प्रत्येक ठिकाणी भक्तीमय कार्यक्रम, सेवा उपक्रम आणि सामुदायिक सहभागाने रथयात्रा साजरी केली जाते. गोव्याच्या प्रत्येक कोपऱ्यात भगवान श्री सत्य साई बाबांचा प्रेम, एकता आणि निस्वार्थ सेवेचा संदेश पोहोचवण्याचा या यात्रेचा उद्देश आहे. गोव्यातील प्रवास पूर्ण केल्यानंतर रथ महाराष्ट्र आणि इतर राज्यांकडे मार्गस्थ होईल.

# रोहित शर्माने अखेर घेतली निवृत्ती

## आयपीएल सुरू असताना घेतला निर्णय | चाहत्यांना दिला मोठा धक्का : एकदिवसीय सामने खेळणार

**मुंबई, दि. ७ :**

रोहित शर्माने आपल्या चाहत्यांना आता एक मोठा धक्का दिला आहे. कारण आयपीएल खेळत असताना रोहित शर्माने निवृत्ती जाहीर केली आहे, त्यामुळे भारताच्या चाहत्यांना हा एक मोठा धक्का असेल.

रोहित हा गेल्या दोन सामन्यांत चांगली फलंदाजी करू शकला नव्हता. त्याचबरोबर रोहित शर्मा हा फक्त इम्पॅक्ट प्लेअर म्हणूनच खेळत होता. पण आता रोहित शर्माने आता एक मोठा निर्णय घेतला आहे. आता आपण यापुढे कसोटी क्रिकेट खेळणार नसल्याचे रोहित शर्माने आता स्पष्ट केले आहे. यापूर्वी रोहितने टी २० क्रिकमधून निवृत्ती घेतली होती, त्यानंतर आता तो कसोटी क्रिकेटमध्येही खेळणार नसल्याचे आता स्पष्ट झाले आहे. सध्याच्या घडीला आयपीएल सुरु आहे. पण आयपीएलनंतर भारतीय संघ इंग्लंडच्या दौऱ्यावर जाणार होता. त्यासाठी रोहित शर्माची निवड होणार की नाही, याची चर्चा सुरु होती. पण निवड समितीने संघ निवडण्यापूर्वीच आपण कसोटी क्रिकेट खेळणार नसल्याचे आता रोहित शर्माने स्पष्ट केले आहे.

**रोहतिने १२ कसोटी शतके झळकावली**

रोहितने २०१३ मध्ये भारतासाठी कसोटी पदार्पण केले. २०२१ मध्ये तो प्लेइंग–११ मध्ये आपले स्थान पक्के करण्यात यशस्वी झाला आणि २०२२ मध्ये त्याला कर्णधारपदही मिळाले. भारतासाठी ६७ कसोटी सामन्यांमध्ये त्याने ४०.५७ च्या सरासरीने धावा केल्या, परंतु घराबाहेर त्याची सरासरी ३१.०१ पर्यंत घसरली.



ऑस्ट्रेलियामध्ये रोहितची सरासरी २४.३८ होती आणि दक्षिण आफ्रिकेत ती १६.६३ होती. तथापि, इंग्लंडमध्ये त्याने ४४.६६ च्या सरासरीने धावा केल्या. गेल्या दौऱ्यात त्याने सलामीला फलंदाजी करताना शतकही झळकावले आहे. रोहितच्या निवृत्तीनंतर, टीम इंडिया यशस्वी जयस्वाल आणि केएल राहुल यांना कसोटी संघात कायमस्वरूपी सलामीवीर म्हणून बसवण्यावर लक्ष केंद्रित करू शकते.

न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या शेवटच्या कसोटी मालिकेतही रोहित फलंदाजीत खूपच खराब कामगिरी करत होता. तो न्यूझीलंडविरुद्ध १५.१६ आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध ६.२० च्या सरासरीने धावा करू शकला. निवडकर्त्यांनी आता निर्णय घेतला आहे की रोहितच्या या फॉर्ममुळे त्याला कर्णधारपदाची जबाबदारी देता येणार नाही.

जर रोहितकडून कसोटी कर्णधारपद काढून घेतले गेले तर हे देखील स्पष्ट होईल की इंग्लंडमधील त्याच्या खराब कामगिरीमुळे त्याला प्लेइंग–११ मधूनही वगळले जाऊ शकते. ऑस्ट्रेलियामध्येही रोहितने सुरुवातीच्या सामन्यांमध्ये सलामी दिली नाही. या मालिकेत सलामीवीर म्हणून यशस्वी जैस्वाल आणि केएल राहुल यांनी शानदार कामगिरी केली होती.

रोहित पहिला कसोटी सामना खेळू शकला नाही. दुसऱ्या कसोटीत तो प्लेइंग–११ चा भाग बनला, पण मधल्या फळीत फलंदाजी करायला आला. त्यानंतर जसप्रीत बुमराहच्या नेतृत्वाखाली भारताने पहिला कसोटी सामना जिंकला, परंतु रोहितच्या नेतृत्वाखाली २ सामने गमावले. तो सिडनीमधील शेवटचा कसोटी सामना खेळला नाही आणि आता त्याने निवृत्ती घेतली आहे.

एक्सप्रेसमधील एका वृत्तानुसार, जूनमध्ये सुरू होणाऱ्या इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी टीम इंडिया नवीन कसोटी कर्णधाराची निवड करेल. तथापि, रोहितला फलंदाज संघाचा भाग म्हणून ठेवण्यात येईल. निवडकर्त्यांचा निर्णय स्वीकारण्यास बीसीसीआय तयार असल्याचेही म्हटले जात आहे.

३८ वर्षीय रोहितकडून कसोटी कर्णधारपद काढून घेण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे त्याचा रेड बॉल क्रिकेटमधील फॉर्म असल्याचे मानले जाते. तसेच त्याच्या नेतृत्वाखाली, संघाला घरच्या मैदानावर न्यूझीलंडविरुद्ध ३–० असा पराभव पत्करावा लागला आणि ऑस्ट्रेलियातील बॉर्डर गावस्कर ट्रॉफीमध्येही ३–१ असा पराभव पत्करावा लागला. या पराभवांमुळे, टीम इंडिया वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीसाठी पात्र ठरू शकली नाही.मार्चमध्ये, त्याच एक्सप्रेसच्या वृत्तात असे म्हटले होते की बीसीसीआय इंग्लंड दौऱ्यासाठी रोहितला कर्णधार म्हणून कायम ठेवेल. रोहितने स्वतः ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार मायकेल क्लार्कसोबतच्या पॉडकास्टमध्ये कर्णधारपद सुरू ठेवण्याची इच्छा व्यक्त केली आहे. रोहित म्हणाला होता की इंग्लंडमध्ये बुमराह, शमी आणि सिराज यांच्या वेगवान गोलंदाजीचे नेतृत्व करण्यास तो उत्सुक आहे. तथापि, निवड समितीने अलीकडेच मुंबईतील बीसीसीआय मुख्यालयात झालेल्या बैठकीत बोर्डाला त्यांच्या भविष्यातील योजनेबद्दल सांगितले.

# वनडे मालिकेसाठी वेस्ट इंडिज संघ जाहीर..!

## वेस्ट इंडिजचा इंग्लंड आणि आयर्लंडचा दौरा | दमदार खेळाडूंना मिळाली संधी

**नवी दिल्ली, दि. ७ :**

२ वेळचा टी२० विश्वचषक विजेता संघ वेस्ट इंडिजने इंग्लंड आणि आयर्लंडविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी आपला संघ जाहीर केला आहे. या महिन्याच्या अखेरीस वेस्ट इंडिजचा संघ इंग्लंड आणि आयर्लंडचा दौरा करणार आहे. तिथे वनडे मालिका आयोजित केली जाईल आणि त्यासाठी संघाची घोषणा आधीच करण्यात आली आहे.



वेस्ट इंडिज आणि आयर्लंडमध्ये (२१ मे ते २५ मे) दरम्यान ३ सामन्यांची वनडे मालिका खेळवली जाईल. त्यानंतर (२९ मे ते ३ जून) दरम्यान इंग्लंडविरुद्ध वनडे मालिका आयोजित केली जाईल. एकूण ६ वनडे सामन्यांचे आयोजन केले जाईल. यादरम्यान विस्फोटक फलंदाज शाई होप संघाचे नेतृत्व करताना दिसणार आहे. तर ब्रँडन किंग, एविन लुईस आणि केसी कार्टी सारख्या फलंदाजांनाही संघात स्थान मिळाले आहे. त्याच वेळी, युवा खेळाडू ज्वेल अँड्र्यूचाही संघात समावेश करण्यात आला आहे. त्याने गेल्या वर्षीच्या आयसीसी अंडर–१९ पुरुष क्रिकेट विश्वचषकात उत्कृष्ट खेळ दाखवला होता.

या मालिकेसाठी शिमरन हेटमायरला संघात स्थान देण्यात आलेले नाही. याचे कारण म्हणजे तो सध्या आयपीएलमध्ये खेळत आहे. तो येथे राजस्थान रॉयल्सचा भाग आहे. राजस्थानचा संघ प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडला असला तरी, तरीही हेटमायरला संघात स्थान मिळालेले नाही. कदाचित त्याचा कामाचा ताण लक्षात घेऊन विश्रांती देण्यात आली असेल. २०२४च्या अखेरीस बांगलादेश आणि इंग्लंडविरुद्धच्या घरच्या मालिकेत यशस्वी झालेल्या बहुतेक खेळाडूंना वेस्ट इंडिज संघात स्थान मिळाले आहे.

वेस्ट इंडिज संघाचा संपूर्ण संघ– शाई होप (कर्णधार), ज्वेल अँड्र्यू, केसी कार्टी, रोस्टन चेस, मॅथ्यू फोर्ड, जस्टिन ग्रीव्हज, आमिर जांगू, अल्झारी जोसेफ, शमार जोसेफ, ब्रँडन किंग, एविन लुईस, गुडाकेश मोती, शेरफेन रुदरफोर्ड, जेडेन सील्स, रोमारियो शेफर्ड

या वर्षीचा हा पहिलाच दौरा असेल. यामुळे सर्व संघांना २०२७च्या विश्वचषकासाठी त्यांचा संघ तयार करण्यास मदत होईल. वेस्ट इंडिजचे मुख्य प्रशिक्षक डॅरेन सॅमी म्हणाले, आगामी २०२%च्या विश्वचषकाच्या दृष्टीने या सामन्यांचे खूप महत्त्व आहे. बांगलादेशविरुद्धच्या मालिकेतील क्लीन स्वीप आणि इंग्लंडविरुद्धच्या विजयावरून असे दिसून येते की आम्ही योग्य संघ तयार करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहोत. तेथील परिस्थिती खूपच आव्हानात्मक असेल अशी आमची अपेक्षा आहे. आम्ही अशी संस्कृती निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहोत जेणेकरून आम्ही ज्या ब्रँडसाठी ओळखले जातो त्या ब्रँडचे क्रिकेट खेळू शकू.

# भूमिका नर्सिंग कॉलेजमध्ये 'आपत्कालीन काळजी सेवा आणि प्रथमोपचार'वर प्रशिक्षण

■ *टीम दैनिक हेराल्ड*

साखळी, दि. ७ : पर्येतील श्री भूमिका नर्सिंग कॉलेजमध्ये आपत्कालीन काळजी सेवा आणि प्रथमोपचार यावर एक दिवशीय प्रशिक्षण शिबीर संपन्न झाले.

श्री भूमिका नर्सिंग कॉलेज पर्येच्या अभ्यासक्रम आणि निरंतर नर्सिंग शिक्षण समिती,आणि राष्टीय सेवा योजना, एम्री ग्रीन हेल्थ सर्व्हिसेस, इमर्जन्सी मेडिसिन लर्निंग सेंटर बांबोळी यांच्या संयुक्त विद्यमाने सदर शिबीर संपन्न झाले. ए.एन.एम.,जी.एन.एम.,आणि बी.एस्सी.नर्सिंगच्या विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना यावेळी प्रशिक्षण देण्यात आले. सदर प्रशिक्षण श्री भूमिका नर्सिंग कॉलेजच्या बहुउद्देशीय सभागृहात संपन्न झाले.एम्रीच्या संघाने विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना वैद्यकीय आणीबाणी, आघात आणीबाणी आणि रुग्णवाहिका सेवांमध्ये प्रथमोपचार व्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिले.आणीबाणीच्या वेळी प्रथमोपचार व्यवस्थापनात कौशल्य प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना हृदयासंदर्भात आपत्कालीन सेवा,बालरोग आणीबाणी आणि मलमपट्टी या विषयांवर प्रशिक्षण देण्यात आले. प्राचार्य डॉ. एस.वसंथाकुमारी यांनी संपूर्ण संघाचे अभिनंदन केले.कौशल्य मूल्यांकन यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.कु. केझिया आणि सुश्री विशा, द्वितीय वर्ष बी. एस्सी नर्सिंगच्या विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण कार्यक्रमाबद्दल त्यांचे अनुभव व्यक्त केले. श्री भूमिका नर्सिंग कॉलेजच्या सहाय्यक प्राध्यापिका कु.सायली गावडे यांनी आभार मानले.

# गुजरातचा शेवटच्या बॉलवर थरारक विजय

## मुंबई इंडियन्सवर ३ विकेट्सने मात | पावसामुळे सामना २ वेळा थांबवावा लागला

**मुंबई, दि. ७ :**

श्वास रोखून धरायला भाग पाडणाऱ्या सामन्यात गुजरात टायटन्सने मुंबई इंडियन्सवर शेवटच्या चेंडूवर सनसनाटी विजय मिळवला आहे. मुंबईने २० ओव्हरमध्ये ८ विकेट्स गमावून १५५ धावा केल्या होत्या. मात्र गुजरातच्या डावात १४ आणि त्यानंतर १८ व्या ओव्हरनंतर पावसाच्या व्यत्ययामुळे खेळ थांबवावा लागला. गुजरातने तोवर ६ विकेट्स गमावून १३२ धावा केल्या होत्या. पावसामुळे काही मिनिटं वाया गेली. त्यामुळे पाऊस थांबल्यानंतर गुजरातला १९ ओव्हरमध्ये १४७ धावांचे सुधारित आव्हान मिळालं. त्यामुळे गुजरातला विजयासाठी ६ बॉलमध्ये १५ धावा करायच्या होत्या. मुंबईकडून दीपक चाहर याने ही शेवटची ओव्हर टाकली.



गुजरातकडून राहुल तेवतिया आणि गेराल्ड कोएत्झी या जोडीने फटकेबाजी करत गुजरातला विजयाजवळ आणून ठेवलं. मात्र गेराल्ड पाचव्या चेंडूवर कॅच आऊट झाला. त्यामुळे गुजरातला शेवटच्या बॉलवर विजयासाठी १ धावेची गरज होती. सामना बरोबरीत होता. गेराल्ड आऊट झाल्याने युवा अर्शद खान मैदानात आला. मुंबई आणि गुजरातच्या चाहत्यांची धाकधुक वाढली होती. शेवटच्या बॉलवर काय होणार? कोण जिंकणार? याची उत्सूकता चाहत्यांना होती. दीपक चाहरने शेवटचा बॉल टाकला. अर्शद खानने फटका मारला आणि नॉन स्ट्राईक एंडच्या दिशेने धावत १ रन घेतली. गुजरातने अशापक्रारे शेवटच्या बॉलवर सनसनाटी विजय मिळवला. गुजरातने डीएलएसनुसार ३ विकेट्सने हा सामना जिंकला. गुजरातने यासह मुंबईचा विजय रथ रोखला. गुजरातचा हा या मोसमातील आठवा विजय ठरला. गुजरातने यासह पॉइंट्स टेबलमध्ये १६ गुणांसह पहिल्या स्थानी स्थानी झेप घेतली. तर मुंबईची पाचव्या पराभवासह पॉइंट्स टेबलमध्ये चौथ्या स्थानी घसरण झाली.

गुजरातसाठी निर्णायक क्षणी गेराल्ड कोएत्झी याने १२ आणि राहुल तेवतिया याने नाबाद ११ धावांची खेळी केली. तसेच कर्णधार शुबमन गिल याने सर्वाधिक धावा केल्या. शुबमनने ४६ बॉलमध्ये ४३ धावांचं योगदान दिलं. जोस बटलर याने ३० तर शेरफेन रुदरफोर्ड याने २८ धावा जोडल्या. मुंबईकडून ट्रेंट बोल्ट, जसप्रीत बुमराह आणि अश्वनी कुमार या तिघांनी प्रत्येकी २–२ विकेट्स घेत १५५ धावांचा यशस्वी बचाव करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यात ते अपयशी ठरले.

त्याआधी गुजरातने टॉस जिंकून मुंबईला बॅटिंगसाठी भाग पाडले. विल जॅक्स आणि सूर्यकुमार यादव या जोडीने सर्वाधिक धावांचं योगदान दिले. मुंबईसाठी विल जॅक्स याने सर्वाधिक ५३ धावांची खेळी केली. तर सूर्यकुमार यादवने ३५ धावा जोडल्या. तर अखेरच्या क्षणी कॉर्बिन बॉश याने निर्णायक २७ धावा केल्या. त्यामुळे मुंबईला २० ओव्हरमध्ये ८ विकेट्स गमावून १५५ धावांपर्यंत पोहचता आले. विल, सूर्यकुमार आणि कॉर्बिन या तिघांव्यतिरिक्त मुंबईच्या इतर फलंदाजांनी निराशा केली. रोहित, हार्दिक, तिलक आणि इतर फलंदाजांना दुहेरी आकडाही गाठता आला नाही. गुजरातचे सहाचे सहा गोलंदाज यशस्वी ठरले. साई किशोर याने दोघांना आऊट केलं. तर मोहम्मद सिराज, अर्शद खान, प्रसिध कृष्णा, राशिद खान आणि गेराल्ड कोएत्झी या ५ जणांनी प्रत्येकी १–१ विकेट मिळवली.

# हार्दिक पांड्या आणि गुजरातचा चीफ कोच नेहराला दंड

- मुंबईचा दुसरा स्लो ओव्हर रेट
- कर्णधार आणि खेळाडूंनाही २४ लाखांचा दंड

**मुंबई, दि. ७ :**

मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पंड्या, त्याच्यासह प्लेइंग इलेव्हनमधील इतर खेळाडू आणि प्रभावशाली खेळाडूंना स्लो ओव्हर रेटसाठी दंड ठोठावण्यात आला आहे. गुजरात टायटन्सचे प्रशिक्षक आशिष नेहरालाही त्यांच्या सामना शुल्काच्या २५ टक्के दंड ठोठावण्यात आला आहे.



या हंगामात मुंबई इंडियन्सचा स्लो ओव्हर रेटचा हा दुसरा प्रकार आहे. त्यामुळे, संघाचा कर्णधार हार्दिक पंड्याला २४ लाख रुपये दंड ठोठावण्यात आला आहे आणि अंतिम अकरा जणांमधील सर्व सदस्यांना, ज्यामध्ये इम्पॅक्ट खेळाडू आणि कन्कशन पर्यायी खेळाडूंचा समावेश आहे, त्यांना ६ लाख रुपये किंवा सामन्याच्या खर्चाच्या २५ टक्के, जे कमी असेल ते दंड ठोठावण्यात आला आहे.

आयपीएलच्या आचारसंहितेचे उल्लंघन केल्याबद्दल गुजरात टायटन्सचे मुख्य प्रशिक्षक आशिष नेहराला त्यांच्या सामन्याच्या मानधनाच्या २५ टक्के दंड आणि एक डिमेरिट पॉइंटही देण्यात आला आहे. त्याने कलम २.२० अंतर्गत लेव्हल १ चा गुन्हा कबूल केला, जो खेळाच्या भावनेविरुद्ध वर्तनाशी संबंधित आहे. त्याने सामनाधिकारीची शिक्षा स्वीकारली आहे.

खरं तर, मुंबई इंडियन्सच्या डावाच्या पाचव्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर फॉर्ममध्ये असलेल्या मुंबई इंडियन्सच्या फलंदाज सूर्य कुमार यादवला जीवदान मिळाले. मिडविकेटवर उभ्या असलेल्या साई किशोरच्या हातातून चेंडू निसटला. त्यानंतर गुजरात टायटन्सचे प्रशिक्षक आशिष नेहरा यांचा राग सुटला आणि ते डगआउटमधून ओरडू लागले.

पावसामुळे व्यत्यय आलेल्या आयपीएल सामन्यात गुजरात टायटन्सने मुंबई इंडियन्सचा ३ विकेट्सने पराभव केला. गुजरातला १५५ धावांचे लक्ष्य मिळाले. खेळ पुन्हा सुरू झाला आणि गुजरातला १४७ धावांचे सुधारित लक्ष्य देण्यात आले. संघाला ६ चेंडूत १५ धावांची आवश्यकता होती. दीपक चहरला त्याचा बचाव करता आला नाही. वानखेडे स्टेडियमवर गुजरातने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मुंबईने २० षटकांत ८ गडी गमावून १५५ धावा केल्या. विल जॅक्सने ५३ आणि सूर्यकुमार यादवने ३५ धावा केल्या. साई किशोरने २ विकेट घेतल्या.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २४५ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 245 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .